# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
## जिल्हा - ठाणे.

प्रसिध्दीसाठी
दिनांक:- १०/०१/२०२५.

**<u>अविघटनशील प्लॅस्टिक साठवणुक केलेप्रक्ररणी भिवंडी महानगरपालिकेचे प्लॅस्टिक निर्मुलन पथकांनी दुकानांवर कडक कारवाई</u>**

मा. प्रशासक तथा आयुक्त यांचे निर्देशानुसार महानगरपालिकेचे प्लॅस्टिक निर्मुलन पथकांनी दिनांक १९/१२/२०२४ रोजी मे. संतोषी पर्ल विडस्, टेमघर, यांची रु. ५०००/- दंड, दिनांफ २०/१२/२०२४ रोजी मे. नवकार पेपर, अंजुरफाटा यांना रु. ५०००/- दंड, दिनांक ६/०१/२०२५ रोजी, मे. लिबर्टी हॉटेल आणि आम्रपाली बार अँड रेस्टॉरंट यांना अनुक्रमे रु. १०,०००/- दंड, दि. ८/०१/२०२५ रोजी, मे. आशापुरा किराणा स्टोअर्स भादवड आणि मे. वेलकम हॉटेल, कल्याणनाका यांना अनुक्रमे रू. १०,०००/- दंड दि. १०/०१/२०२५ रोजी, मे. विलास वाईन्स, धामणकरनाका यांना रु. ५०००/- दंड या ठिकाणी धाड टाकली असता जनरल आयटम्स्, प्लास्टिक पिशवी (अविघटनशील एकल वापर प्लॅस्टिक) साठा अंदाजे ५०० किलो माल जप्त करण्यात आलेला आहे. जप्त केलेला माल मनपाच्या आरोग्य भांडारगृहात जमा करण्यात आलेला आहे. संबंधित दुकानदार यांना अविघटनशील प्लॅस्टिक साठवणुक करीता एकुण रक्कम रु. ३५,०००/- दंड आकारण्यात आला आहे.

तसेच नायलॉन मांजाच्या विक्रीस व वापरास प्रतिबंध घालण्यावाचत पर्यावरण विभागामार्फत दिनांक २९/११/२०२४ रोजी जनसंपर्क विभागास दैनिक वृत्तपत्रात जाहीर आवाहन प्रसिध्द कळविण्यात आले होते. व त्यानुसार प्रसिध्द करण्यात आली. तसेच सहा. आयुक्त, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ ते ५ यांना पर्यावरण विभागामार्फत नायलॉन मांजाच्या विक्रीस व वापरास प्रतिबंध घालण्याबायत दिनांक ०२/०१/२०२५ रोजी कार्यवाही करणेबाबत पत्र देण्यात आले आहे. तसेच आज दि. १०/०१/२०२५ रोजी दुकान विक्रेते यांच्याकडुन नायलॉन मांजा व प्लॅस्टिक पंतगाचा साठा पकडण्यात आला.

प्लॅस्टिक निर्मुलन व नायलॉन मांजाच्या विक्रीस प्रतिबंध, दंडात्मक व जनजागृती करून प्रभावीपणे कार्यवाही करणेकामी नव्याने एकुण १० कर्मचा-यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यानुसार कार्यवाही यापुढे चालू राहणार आहे.

(श्रीकांत परदेशी)
माहिती व जनसंपर्क अधिकारी
भिवंडी नि. शहर महानगरपालिका